पुणे, दिनांक २७/०७/२०१९

**प्रेस नोट**

मा. डॉ. व्यंकटेशम् पोलीस आयुक्त, पुणे शहर व मा. श्री. रविंद्र शिसवे, पोलीस सहआयुक्त,पुणे शहर यांचे आदेशान्वये, श्री. मोराळे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, पुणे शहर, श्री. बच्चन सिंग, पोलीस उपआयुक्त, गुन्हे ,पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेकडील सर्व युनिटचे अधिका-यांनी पुणे शहरात परिमंडळ-०१ ते ०५ चे परिक्षेत्रामध्ये दिनांक २७/०७/२०१९ रोजी रात्रौ २२.०० वा. ते पहाटे ०५.०० वा. चे दरम्यान **विशेष कोबिंग ऑपरेशन** करुन त्यामध्ये घरफोडी चोरी करणारे, तडीपार, रेकॉर्डवरील फरार/पाहिजे आरोपी याप्रमाणे एकुण ११० गुन्हेगार चेक केले आहेत.

कोबिंग ऑपरेशनमध्ये नमुद एकुण ११० गुन्हेगारांपैकी २५ गुन्हेगार जेलमध्ये, ०८-गुन्हेगार तडीपार असलेचे, ०१- गुन्हेगार मयत झालेचे आढळुन आले. एकुण ३० गुन्हेगार मिळून आले आहेत. ४६ गुन्हेगार मिळुन आले नाहीत. मिळुन आलेल्या गुन्हेगार इसमांकडे चौकशी करुन त्यांचे इन्ट्रांगेशन फॉर्म भरुन घेण्यात आले आहेत.

कोबिंग आपॅरेशन दरम्यान शिवाजीनगर, बंडगार्डन व डेक्कन, हडपसर, मुंढवा, वानवडी, कोंढवा ईत्यादि पो.स्टे. चे हद्दीत हातगाडी, पानटपरी व हॉटेलवर शर्तीपेक्षा पेक्षा जास्त वेळ चालु ठेवले बद्दल महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३३(क्ष)/१३५ प्रमाणे एकुण १९ खटले दाखल करण्यात आले आहेत. तसेच वानवडी पो.स्टे. चे हद्दीत एस.आर.शॉपीवर असलेल्या युवराज हॉटेल,सनं.५०,गणेश कॉलन,काडे पडळ,हडपसर,पुणे येथे छापा टाकुन बेकायदेशीर विनापरवाना देशी तसेच विदेशी दारु विक्री करीत असताना मिळून आलेने वानवडी गुरनं.४१७/१९ महाराष्ट्र प्रोव्ही. कायदा कलम ६५(ई) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हयामध्ये एका इसमास अटक करुन देशी तसेच विदेशी दारुच्या एकुण ५३ बाटल्या व रोख रुपये १०,४२०/- असा मिळून २२९०/- रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

कोबिग आपॅरेशन दरम्यान भारती पो.स्टे. चे हद्दीत अंबिका हॉटेल जवळ कात्रजगांव, पुणे येथे छापा टाकला असता सदर ठिकाणी एक इसम हा मुलीस वेश्यागमन करण्यासाठी घेवून आलेचे निष्पन्न झालेने सदर बाबत भारती विदयापीठ पो.स्टे. गुरनं.५१२/१९ पिटा ॲक्ट कलम ३,४,५ प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे. गुन्हयामध्ये तीन इसमांना अटक करण्यात आली असून पिडीत मुलीची सुटका करण्यात आली आहे.

सदरची कारवाई गुन्हे शाखेकडील पो.नि. श्री. वायकर, श्री. गजानन पवार, श्री. राजेंद्र मोकाशी, श्री. अंजुमन बागवान, श्री.दत्ता चव्हाण, श्री. राजेंद्र मोहिते, श्री. टिकोळे व श्रीमती वैशाली चांदगुडे त्यांचे पथकातील कर्मचा-यांनी केली आहे.